# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:02.08.2025** **वार:शनिवार**

---

1. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं आज पंतप्रधानांच्या हस्ते वितरण
2. उपराष्ट्रपती पदासाठी येत्या 9 सप्टेंबरला मतदान
3. लोकमान्य टिळकांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी जोमाने काम करणार-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन
4. लोकमान्य टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन
5. नाळ दोन, श्यामची आई आणि आत्मपॅम्पलेट या मराठी चित्रपटांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर आणि
6. अथेन्समध्ये सुरू असलेल्या महिला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताची 2 सुवर्ण आणि 3 रौप्य पदकांसह 6 पदकांची कमाई

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण होणार आहे. पंतप्रधान आज वाराणसीला भेट देणार आहेत. यावेळी ते शेतकरी कल्याणासाठी एक महत्वाचं पाऊल म्हणून, पी एम किसान योजनेचा 20 वा हप्ता जाहीर करतील. प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी 70 लाख शेतकऱ्यांच्या खात्यात 20 हजार 500 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम थेट जमा करण्यात येईल. उत्तर प्रदेशातल्या 2 हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>उपराष्ट्रपती निवडणूक</u>**

उपराष्ट्रपती पदासाठीची निवडणूक येत्या 9 सप्टेंबर रोजी होईल आणि त्याच दिवशी मतमोजणी होईल असं काल निवडणूक आयोगानं जाहीर केलं. याबाबतची अधिसूचना 7 ऑगस्ट रोजी काढण्यात येईल आणि 21 ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे. आयोगानं या निवडणुकीसाठी मतदार संघातल्या सदस्यांची यादी अद्ययावत केली आहे.

**<u>टिळक पुरस्कार</u>**

विश्वगुरू बनण्याची क्षमता देशात असून, तरुण आणि गुणवान तंत्रज्ञ तयार होत आहेत; त्यांनी आत्मविश्वास, आणि सकारात्मकता ठेवली तर आपला देश जगात पहिल्या क्रमांकाची महासत्ता बनू शकतो, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल पुण्यात व्यक्त केला. त्रेचाळीसावा लोकमान्य टिळक

राष्ट्रीय पुरस्कार गडकरी यांना टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. या सन्मानामुळे आपली जबाबदारी आणखी वाढली असून लोकमान्य टिळकांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी येणाऱ्या काळात अधिक जोमाने काम करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. लोकमान्य टिळकांसारखा बाणा असणारे नितीन गडकरी हे केवळ नेते नाहीत तर संशोधक आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडकरी यांचा गौरव केला. गडकरी यांनी पक्षीय राजकारणाऐवजी विकासाचं राजकारण करून देशात रस्ते, महामार्ग, पूल यांचं जाळ भक्कम केलं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित  भारताच्या शिल्पकारांपैकी नितीन गडकरी एक महत्त्वाचे नेते आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

**अण्णाभाऊ साठे जयंती**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 105 वी जयंती काल राज्यभरात उत्साहात साजरी करण्यात आली. पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अण्णा भाऊंच्या साहित्यखंडांचं प्रकाशन करण्यात आलं. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील सारसबागेजवळच्या अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनातर्फे दिला जाणारा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार काल युवा दिग्दर्शक रमेश होलबोले यांना दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**वैष्णव**

सणासुदीच्या काळात मोठी गर्दी असणाऱ्या 73 रेल्वे स्थानकांवर विशेष स्थानक प्रमुख नेमण्यात येईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल राज्यसभेत सांगितलं. गर्दी तत्काळ कमी करण्यासाठी स्थानक प्रमुख निर्णय घेऊ शकतील, त्यामुळे दुर्घटना टाळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गर्दी होऊ नये, म्हणून रेल्वे, मोठे पादचारी पूल आणि स्थानकांच्या बाहेर प्रतिक्षालयं उभारण्यावर भर देईल, असंही ते म्हणाले. CCTV द्वारे स्थानकांवर लक्ष ठेवलं जाईल, तसंच वॉकी-टॉकी, उद्घोषणा यांची मदतही घेतली जाईल. स्थानकावर केवळ तिकीट धारकांनाच प्रवेश मिळेल, प्रतीक्षा यादीवरील प्रवासी स्थानकाबाहेरच्या प्रतीक्षालयात थांबू शकतील, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**आयरलँड**

डब्लिनमधल्या भारतीय दुतावासानं आयरलँडमधल्या भारतीयांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, काही निर्देश जारी केले असून, सर्व भारतीय नागरिकांना सुरक्षिततेसाठी स्वतःची काळजी घेण्याची सूचना केली आहे.तसंच निर्जन ठिकाणी नं जाण्याचा सल्ला दिला आहे. आयरलँडमध्ये भारतीय नागरिकांच्या विरोधात हल्ल्यांच्या घटना वाढल्या असल्याचं दुतावासानं काल जारी केलेल्या निर्देशांमध्ये म्हटलं आहे. या संदर्भात दूतावास आयरलँडमधल्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आहे.

**<u>नासा</u>**

नासा आणि स्पेस-एक्स यांनी संयुक्तपणे नव्या मोहिमेला सुरवात केली असून काल 4 अंतराळवीरांना, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पाठवण्यात आलं. या मोहिमेअंतर्गत अमेरिकेचे 2, जपानचा एक आणि रशियाचा एक अंतराळवीर सहा महिने अंतराळ स्थानकात वास्तव्य करतील. ह्या अंतराळवीरांना गुरुत्वाकर्षणाशी संबंधित विविध प्रयोग करण्याचं काम देण्यात आलं असून या आधी अंतराळस्थानकात रहात असलेले अंतराळ वीर पृथ्वीवर परत येतील.

**<u>राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार</u>**

71 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार काल जाहीर करण्यात आले. 'बारहवी फेल' हा 2023 मधला सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला असून, 'कटहल अ जॅकफ्रूट मिस्टरी' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट नवोदित दिग्दर्शकाचा पुरस्कार 'आत्मपॅम्फ्लेट' या मराठी चित्रपटासाठी दिग्दर्शक आशीष भेंडे यांना मिळाला आहे. सर्वोत्कृष्ट बाल चित्रपटाचा पुरस्कार 'नाळ' दोन या मराठी चित्रपटाला तर सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार 'श्यामची आई' चित्रपटाला जाहीर झाला आहे.

**<u>महादहीहंडी महोत्सव</u>**

महाराष्ट्र सरकारनं गोकुळाष्टमीच्या दही हंडी महोत्सवात सहभागी होणाऱ्या एक लाख 50 हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्याची घोषणा केली आहे. सरकार त्यांच्या सुरक्षेसाठीचा खर्च ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून प्रति सहभागी 75 रुपये या दराने उचलणार आहे. मानवी मनोरा करताना जखमी होणाऱ्या गोविंदांच्या मदतीसाठी सरकारनं हा निर्णय घेतला आहे. यासाठी क्रीडा विकास निधीतून एक कोटी 12 लाख रुपये देण्यात येणार आहे. ही योजना महाराष्ट्र राज्य दही हंडी गोविंदा संघटना आणि क्रीडा आणि युवक सेवा विभागाच्या सहकार्यानं अमलात आणली जाईल.

**<u>कोल्हापूर खंडपीठ</u>**

मुंबई उच्च न्यायालयाचं खंडपीठ महाराष्ट्रातल्या कोल्हापूरात स्थापन करण्याची मागणी मंजूर झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांनी यासंदर्भातलं राजपत्र काल प्रसिद्ध केलं. 18 ऑगस्टपासून हे खंडपीठ कार्यरत होईल.

**<u>सिक्कीम</u>**

सिक्कीममध्ये, केंद्र सरकारच्या रणभूमी दर्शन योजने अंतर्गत, देशातल्या पर्यटकांसाठी चो ला आणि डोकलाम ही ठिकाणं खुली करण्याची तयारी सुरू आहे. यामध्ये डोकलाम, चो ला आणि नाथुला या राज्यातील रणभूमी पर्यटन म्हणून ओळखल्या गेलेल्या स्थळांचा समावेश आहे. नाथुला एक लोकप्रिय पर्यटन स्थळ असून, इतर स्थळ, लष्कर आणि संबंधित संस्थांशी चर्चा करून विकसित केली जात आहेत. चालू वर्षाच्या सप्टेंबर अखेरीस पर्यटकांसाठी ही ठिकाणं खुली होतील. भारत आणि चीन या दोन्ही लष्करांच्या 8 वर्षांच्या वाटाघाटीनंतर डोकलाम पर्यटकांसाठी खुलं होतं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड विरुद्धच्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील ओव्हल इथं खेळल्या जात असलेल्या  पाचव्या सामन्यात इंग्लडचा पहिला डाव 247 धावांवर संपला. भारत कालच्या 2 बाद 75 धावांवरून आज आपला डाव पुढे सुरू करेल. भारतानं एकंदर 52 धावांची आघाडी घेतली आहे. मालिकेत बरोबरी साधण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे आवश्यक आहे.

**कुस्ती**

अथेन्समध्ये सुरू असलेल्या 17 वर्ष खालील महिलांच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटूंनी आपलं वर्चस्व कायम ठेवत 2 सुवर्ण आणि 3 रौप्य पदकांसह  एकंदर 6 पदकं पटकावली. रचनानं 43 किलो गटात सुवर्ण पदक जिंकलं तर आश्विनी विष्णईनं 65 किलो गटात विजय मिळवला. भारतीय महिला कुस्ती संघानं 151 गुणांसह चॅम्पियन ट्रॉफी जिंकली, तर अमेरिकेने 142 गुणांसह उपविजेतेपद मिळवले. पुरुषांच्या कुस्तीमध्ये, हरदीपनं ग्रेको-रोमन 110 किलो गटात सुवर्ण पदक जिंकून इतिहास नोंदवला. या वजनी गटात सुवर्णपदक पटकावणारा तो पहिला भारतीय खेळाडू  आहे. उद्या या स्पर्धेचा समारोप आहे.  यामध्ये 30 भारतीय कुस्ती पटू फ्रीस्टाइल श्रेणीत लढणार आहेत.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.